### १०.१० गृहीतकाची सिद्धता

अध्ययन विषयाच्या संदर्भात मिळालेल्या प्राथमिक दुय्यम व अपारंपारिक स्त्रोताच्या आधारे (सांख्यकीय विश्लेषणानुसार) गृहीतकांची पडताळणी केली असता हाती आलेल्या निष्कर्षांच्या आधारे संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी निश्चित केलेली पुढील गृहीतके सिद्ध झालेली आहेत.

१) **वृद्धाश्रमांची वाढती गरज व त्यामुळे वाढती संख्या लक्षात घेता व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण केल्यास व शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्यास वृद्धाश्रमाच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होऊ शकेल.**

★१० (१.४, १.९, १.१०, २.४, ३.१, ३.२, ३.४, ४.१, ४.३, ६, ७)

२) **धोरणकर्त्यांकडून आर्थिक अपेक्षा न ठेवता समाजाच्या सहकार्यावर वृद्धाश्रम चालविणे आवश्यक आहे.**

★१० (१.६, १.७, १.८, १.१२, ४.२, ६, ७)

३) **समाजसेवा म्हणून चालविण्याबरोबरच सेवा उद्योग (Service Industry) म्हणून वृद्धाश्रम चालविणे सातत्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आधिक उपयुक्त ठरेल.**

★ (१.१, १.२, १.३, १.९, १.११, २.१, २, ३, ६, ७)

संशोधिकेने पूर्ण प्रबंधामध्ये गुणात्मक बाजूंचा विचार केला आहे म्हणून शिफारशी या गुणात्मक सूचनांच्या स्वरूपाच्या आहेत. त्या स्वीकारल्यास काय होईल हे सांगता येते पण त्यामुळे किती फरक पडेल हे निश्चितपणे सांगता येणार नाही. थोडक्यात शिफारशी रुजवल्या पाहिजेत. त्याचा दृष्य परिणाम काही काळाने पण निश्चित दिसेल असे संशोधिकेचे ठाम प्रतिपादन आहे.

प्रकरण ११ वे

## संशोधिकेचे संशोधन-विषयामधील योगदान

१) 'हेल्प एज इंडिया' या वृद्धसेवेमध्ये अग्रणी असलेल्या संस्थेचे अध्यक्ष सी. जॅक्सन कोल यांनी १९७४ मध्ये म्हटले होते की, बदलत्या परिस्थितीमध्ये सेवाभावी संस्थांना यशस्वी व्हायचे असेल तर त्यांना त्यांची जुनी विचारसरणी बदलून संस्था व्यावसायिकतेच्या तत्त्वावर चालवावी लागेल. व्यवस्थापन शास्त्राचे भीष्माचार्य डॉ. पीटर एफ. ड्रकर यांनी आपल्या स्वयंसेवी संस्थांचे व्यवस्थापन या महत्त्वाच्या ग्रंथामध्ये म्हटले आहे की, 'स्वयंसेवी संस्था व्यवस्थापनशास्त्राला नाके

मुरडतात पण त्यांना तसे करून चालणार नाही.' या पार्श्वभूमीवर विचार करता असे लक्षात आले की,

भारतात वृद्धाश्रम चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची स्थिती आजही म्हणजे ३५ वर्षानंतर तशीच आहे, त्यामुळे संशोधन कालखंडामध्ये संशोधिकेने वृद्धाश्रम चालक, व्यवस्थापक, सेवक सर्वांसाठी परिषदा आयोजित करून व्यवस्थापनाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

२) 'वृद्धाश्रम' या विषयावर परिपूर्ण तर नाहीच पण पुरेशी माहितीही उपलब्ध नाही हे लक्षात आल्यावर वृद्धाश्रमाची व्याख्या, प्रकार, उपलब्ध सोयी, आवश्यक कौशल्ये इ. माहिती प्रत्यक्ष भेटी, मुलाखती प्रश्नावली इ. स्रोत वापरून मराठी भाषेत (इंग्रजी भाषेमध्ये सुद्धा) प्रथम उपलब्ध करून दिली व वृद्धाश्रम चळवळीचा पाया रचला असे म्हणावयास हरकत नाही.

३) वृद्धांना राहाण्यासाठी विविध पर्याय कोणते आहेत याची माहिती प्रबंधात प्रथमच मांडली गेली आहे.

४) 'वृद्ध समस्येचे उग्र स्वरूप पाहाता ह्या समस्या सोडविणे शासनाला शक्य होणार नाही त्यासाठी समाजाने पुढे येणे अनिवार्य ठरेल' असा वृद्धाश्रमाचे भवितव्य स्पष्ट करणारा विचार हे संशोधिकेचे योगदान मानावयास पाहिजे.

५) आदर्श वृद्धाश्रमाचे आराखडा/मॉडेल हा संशोधन प्रक्रियेचा परिपाक म्हणावा लागेल. संशोधिकेने यासाठी परिश्रमपूर्वक हा आराखडा तयार केला.

६) नियंत्रणासाठी मध्यवर्ती स्वायत्त संस्था स्थापन करावी अथवा कंपनी कायद्याच्या कलम २५ अ नुसार ना नफा या तत्त्वावर कंपनी सुरू करावी. वृद्धाश्रमांना श्रेणी प्राप्त करून घेणे अत्यावश्यक करावे. वृद्धांचे शोषण होऊ नये म्हणून उपाय-योजना करणे यासारखे प्रबंधामध्ये व्यक्त केलेले विचार म्हणजे संशोधिकेने संशोधनविषयात टाकलेली मोलाची भर आहे हे निर्विवादपणे म्हणावे लागते.

७) विश्वस्त व्यवस्थापक सेवक व रहिवासी या प्रत्येक घटकासाठी वेगळे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता व प्रशिक्षणाचे स्वरूप याबद्दलचे तपशील हे संशोधिकेच्या स्वतंत्र विचाराची अभिव्यक्ती आहे हे येथे नम्रपणे नमूद करणे आवश्यक आहे. या प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सर्व घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न उपयुक्त ठरला यामधे शंका नाही.

८) संस्था यशस्वी होण्यासाठी स्वीकारावा लागणारा व्यावसायिक दृष्टिकोन, प्रभावी विपणन, बाजारपेठेचे संशोधन, ग्राहकांचे समाधान, गुणवत्ता सुधार कार्यक्रम आणि विविध स्तरांवर प्रशिक्षण यासारखी व्यवस्थापनशास्त्राची तत्त्वे, वृद्धाश्रमांना म्हणजेच पर्यायाने समाजसेवेमध्ये काम करणाऱ्या संस्थांना उपयुक्त ठरतील असा वेगळा विचार करून संशोधनाद्वारे ह्या तत्त्वांचा स्वीकार करण्याची

आवश्यकता संशोधिकेने सिद्ध केली.

९) फक्त निराधार व अल्प उत्पन्न गटातील वृद्धांनाच वृद्धाश्रमाची गरज भासते हा पारंपरिक विचार कालबाह्य होत चाललेला आहे त्यामुळे समाजातील उच्चतम उत्पन्न असणाऱ्या गटासह सर्व घटकांना वृद्धत्वामध्ये विविध प्रकारच्या सेवा लागणार आहेत. हा अगदी नवीन विचार करून संशोधिकेने सेवा तसे मूल्य या तत्त्वावर वृद्धाश्रमांची गरज निर्माण होणार आहे त्यासाठी सेवा उद्योग म्हणूनच या क्षेत्राकडे पाहावे लागेल हा वेगळा दृष्टिकोन प्रबंधामध्ये व्यक्त केला आहे.

❐